


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २५१ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# विधानभवनात अशी घटना घडणे योग्य नाही:कारवाई झालीच पाहिजे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची विधानसभा अध्यक्षांना विनंती

मुंबई (वृत्तसंस्था)-राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनाच्या आवारातच जोरदार हाणामारी झाली. या घटनेने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली असून, वातावरण चांगलेच तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली आहे. त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती यांना घटनेची चौकशी करून तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची विनंती केली आहे.विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना आज विधानभवनाच्या परिसरात जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांचे कार्यकर्ते समोरासमोर आले. यावेळी गोपीचंद पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश कटले याने जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांना मारहाण केली असून, शिवीगाळही करण्यात आली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत घटनेचा अहवाल मागवला आहे. या घटनेची आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील गंभीर दखल घेतली आहे.





घडलेली घटना ही अतिशय चुकीची आहे. विधानभवनात अशा प्रकारची घटना घडणे योग्य नाही. विधानसभेचे अध्यक्ष आणि विधानपरिषदेचे सभापती यांच्या अंतर्गत विधानभवनाचा परिसर येतो. त्यामुळे या दोघांनीही घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी. तसेच यावर कडक कारवाई करावी, अशी विनंती मी विधानसभा अध्यक्षांना केल्याचे त्यांनी सांगितले. विधानभवनाच्या परिसरात लोक मोठ्या प्रमाणात जमा होतात आणि मारामारी करतात हे विधानभवनाला शोभणारे नाही. म्हणूनच यावर निश्चित कारवाई ही झालीच पाहिजे, अशी भूमिकाही यावेळी फडणवीस यांनी स्पष्ट केली.आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानभवनाच्या लॉबीत घडलेला प्रकार मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या लक्षात आणून दिला असून, यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांनाही या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही घटनेची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी कठोर कारवाई करावी, अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता विधानसभा अध्यक्ष या प्रकरणावर काय निर्णय घेतात? आणि ते कोणत्या पद्धतीने कारवाई करतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### हाणामारी करणाऱ्या गुंडांसह त्यांच्या पोषिंद्यांवर कारवाई करा - उद्धव ठाकरे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या प्रकरणी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. हाणामारी करणारे



समर्थक होते का गुंड होते? येथे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल तर विधानभवनाला अर्थ काय? ज्यांनी या लोकांना पास दिले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मग तो कोणत्याही पक्षाचा असो. ज्यांनी त्यांना पास दिले त्यांचे नाव पुढे आले पाहिजे. शेवटी हा अधिकार अध्यक्षांचा असतो. अध्यक्षांची दिशाभूल केली गेली का? हा पण विषय आहे. पण अशी मारामारी आमदारांना धक्काबुक्की ही गुंडागर्दी आता विधानभवनापर्यंत पोहोचली असेल तर मग हे फार अवघड आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांनी सर्व विषय सोडून या गुंडांवर व त्यांच्या पोषिंद्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. असे झाले तरच तुम्ही मुख्यमंत्री म्हणून जनतेला तोंड दाखवण्याच्या पात्रतेचे आहात असे मी म्हणेन, असे उद्धव ठाकरे म्हणाले.झाला प्रकार अतिशय गंभीर आहे. विधानभवनासारख्या वास्तूचे पावित्र जपले पाहिजे. त्यांचे वाद वैयक्तिक असतील तर ते बाहेर झाले पाहिजे. पण विधानभवनात गुंड आणणाऱ्यांची चौकशी व्हायला हवी. ज्यांनी पास दिली त्यांच्यावरही कारवाई व्हायला हवी, असेही ठाकरे यावेळी आवर्जुन म्हणाले.


# प्लास्टिक फुलांवर येणार बंदी; फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई । विराम पवार**

सणासुदीचा हंगाम सुरू होताच बाजारात कृत्रिम प्लास्टिक फुलांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. परिणामी नैसर्गिक फुलांची विक्री घटते आणि फुल उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने प्लास्टिक फुलांवर बंदी घालण्याचा विचार सुरू केला असून, यासंदर्भात लवकरच उच्चस्तरीय बैठक आयोजित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या प्राथमिक चर्चेत, कृत्रिम फुलांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, नैसर्गिक फुलांच्या दरात झालेली घसरण आणि फुलशेतीवरील परिणाम या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीचे प्रमुख सूत्रधार तासगाव-कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील हे होते. त्यांनी या विषयासंदर्भात १०५ आमदारांच्या सह्या असलेले पाठिंबा पत्र सादर केले.

### शेतकऱ्यांना दिलासा मिळणार?

**फुलशेती ही सध्या द्राक्षपिक किंवा इतर फळपिकांच्या तुलनेत पर्यायी व्यावसायिक पीक म्हणून पाहिली जाते. मात्र प्लास्टिक फुलांमुळे नैसर्गिक फुलांची किंमत घसरत असल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. या परिस्थितीत सरकारने वेळेत योग्य निर्णय घेतल्यास फुल उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**



आमदार रोहित पाटील यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की,राज्यात प्लास्टिक फुलांचा वापर अत्यंत प्रचंड प्रमाणात होत असून, त्यामुळे नैसर्गिक फुलांची बाजारातील मागणी कमी झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळत नाही. औषधे, मजुरी, वाहतूक अशा सर्व बाबींमध्ये वाढ झाल्याने शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले आहेत. या कृत्रिम फुलांवर बंदी घालण्याची आवश्यकता आहे.

या मागणीला सत्ताधारी व विरोधी पक्षातील अनेक आमदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, १०५ आमदारांनी स्वाक्षरी करून पाठिंबा दर्शवला आहे.या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच फलोत्पादन मंत्री भरत गोगावले आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला ३०० कोटींचा निधी वर्ग

मुंबई (वृत्तसंस्था)-महाराष्ट्र सरकारकडून विविध महामंडळांद्वारे उद्योजक तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरवले जाते. मराठा समाजात उद्योजकतेला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला राज्य सरकारने मोठा निधी दिला आहे.अर्थसंकल्पात या महामंडळासाठी ७५० कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या संदर्भातील शासन निर्णय १ ५ जुलै रोजी जारी करण्यात आला असून, या निर्णयानुसार ३ ०० कोटी रुपयांचा निधी महामंडळाला वर्ग करण्यात आला आहे. महायुती सरकारच्या या निर्णयामुळे मराठा समाजात नवीन उद्योजक निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला गती देण्यासाठी विविध योजना राबवल्या जातात. या योजनांसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी आता ३०० कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्ष वर्ग



करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाने प्रसिद्ध केला आहे.

# शेतकरी सन्मान निधीच्या हप्त्याच्या प्रतीक्षेत शेतकरी

## पाच महिने लोटूनही निधीचा पत्ता नाही हरीप हंगामात शेतकरी अडचणीत



**चिमूर । शेषराव राऊत**

शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे सुरू असलेल्या प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी आणि नमो शेतकरी सन्मान योजनांचे अनुक्रमे २०वा व ७वा हप्ता वितरित होण्यास विलंब झाल्याने शेतकरी प्रचंड प्रतीक्षेत आहेत. हरीप हंगाम सुरू असतानाही पाच महिने उलटून गेले तरीही हा निधी त्यांच्या खात्यावर जमा न झाल्यामुळे शेतकरी वर्गात नाराजीचा सूर आहे.प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गत केंद्र शासन दरवर्षी ६,००० रुपये तर राज्य शासन नमो शेतकरी सन्मान निधी अंतर्गत आणखी ६,००० रुपये अशी एकूण १२,००० रुपयांची मदत चार महिन्यांच्या अंतराने प्रत्येकी ४,००० रुपयांच्या तीन हप्त्यांत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर डीबीटी द्वारे जमा करत असते. या योजनेचा शेवटचा हप्ता फेब्रुवारी २०२५ मध्ये जमा झाला होता.

मात्र त्यानंतर तब्बल पाच महिने उलटले असून जुलै महिना संपत आला आहे, तरीही केंद्राचा २०वा व राज्याचा ७वा हप्ता वितरित झालेला नाही. परिणामी, खरिप पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, औषधे, घरगुती खर्च आणि मुलांच्या शिक्षणाचा भार पेलताना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या दोन्ही योजनांमधून मिळणाऱ्या निधीचा शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठा आधार मिळतो. मागील महिन्याच्या अखेरीस हप्ता जमा होईल अशी आशा निर्माण झाली होती. मात्र तो महिना ही निघून गेला. आता जुलैही संपत आलेला असताना सरकारने अद्याप निधी वितरित केलेला नाही. त्यामुळे शेतकरी 'चातकासारखा' या पैशांच्या वाटेकडे पाहत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहे. सरकारने तत्काळ हप्ता वितरित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता शेतकरी संघटनांकडून होऊ लागली आहे.

### होय,अंबादास दानवे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले नाहीत

# पण भरलेल्या ताटाशी कधी प्रतारणा केली नाही-उद्धव ठाकरे यांचा शिंदेंना टोला

**मुंबई । विराम पवार**

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या दिवशी झालेल्या सभागृहातील चर्चेत, एकीकडे त्यांच्या कामगिरीचे सर्वपक्षीय स्तरावर कौतुक झाले, तर दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सत्ताधारी गटावर निशाणा साधत भावनिक आणि राजकीय संकेत देणारे वक्तव्य केले.ठाकरे म्हणाले, दानवे यांची ही पहिलीच टर्म होती, पण त्यांनी ती अत्यंत प्रभावीपणे पूर्ण केली आहे. त्यामुळे ही शेवटची नाही, तर सुरुवातीचीच टर्म मानतो. तुम्ही पुन्हा यालच - पण याच विचारसरणी आणि पक्षातून या! या वक्तव्यातून त्यांनी अंबादास दानवे यांना पक्षातच कायम राहण्याचे स्पष्ट निमंत्रण दिले.

त्याआधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अंबादास दानवे यांचे कौतुक करताना ते तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले नाहीत असे म्हटले होते. याच विधानाचा आधार घेत उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे शिंदे यांच्यावर शब्दांचा बाण सोडला. ते म्हणाले, होय, दानवे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले नाहीत, पण भरलेल्या ताटाशी त्यांनी कधीच प्रतारणा केली नाही. ते कधी म्हणाले नाहीत की हे ताट माझं आहे, किंवा अजून काही हवं म्हणून दुसरीकडे गेले नाहीत. मात्र, काही लोक भरलेल्या ताटातून उधळून दुसऱ्याच्या रेस्टॉरंटमध्ये गेले आहेत.

या वक्तव्यातून ठाकरे यांनी शिंदे यांच्या बंडखोरीकडे अप्रत्यक्ष इशारा दिला. याचवेळी त्यांनी माजी समाजवादी नेत्या मृणालताई गोरे यांचाही उल्लेख करत, त्या



कधीही पदासाठी डगमगल्या नाहीत,असे सांगून मूल्यनिष्ठ राजकारणाचा आदर्श उभा केला.ठाकरे पुढे म्हणाले, पदं येतात आणि जातात. पण जनतेच्या मनात आपण काय ठसा उमटवतो, हे अधिक महत्त्वाचं आहे. त्यांनी यावेळी खुलासा करत सांगितले की, अंबादास दानवे नुकतेच त्यांच्या घरी आले होते आणि त्यांनी आपली टर्म संपत असल्याची माहिती दिली होती. यावर ठाकरे यांनी 'आपण तुम्हाला काय देऊ शकत नाही' असे सांगितले असता, दानवे म्हणाले की, आत्तापर्यंत जे दिलंय, तेच खूप आहे, असे नम्रपणे उत्तर दिले.भाषणाच्या अखेरीस उद्धव ठाकरे म्हणाले, अंबादास दानवे हा एक असा कार्यकर्ता आहे जो भाजप आणि संघाच्या शिस्तीत घडलेला असूनही आम्हाला मिळाला. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांचे आभार; पण तेच मुख्यमंत्री आमच्याकडून नेते वेगळ्या मार्गाने घेऊन गेले आहेत. या वक्तव्यातून त्यांनी सत्तांतराच्या घडामोडींवर उपरोधिक भाष्य केले.संपूर्ण सत्रात अंबादास दानवे यांच्या प्रामाणिक राजकारणाचा, निष्ठावान कार्यशैलीचा आणि प्रभावी उपस्थितीचा सर्वच सदस्यांनी उल्लेख केला. त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीकडे आता राज्याच्या राजकारणात लक्ष केंद्रित झाले आहे.

# कोसरसार-मकसूर शिवारात वीज पडून शेतमजुराचा मृत्यू

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील कोसरसार-मकसूर शिवारात वीज पडून एका शेतमजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला.ही घटना गुरुवारी दुपारी सुमारे १.३० वाजेच्या सुमारास घडली. रावबा दादाजी मंगाम (वय ४५) हे आपल्या शेतात पराठी खुरपण्याचे काम करत असताना अचानक आकाशात विजेच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला. विजेपासून बचावासाठी ते शेतातील पळसाच्या झाडाखाली लपले. मात्र, दुर्दैवाने याच झाडावर वीज कोसळली आणि त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच शेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार योगेंद्रसिंग यादव यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे पाठविण्यात आला.

रावबा मंगाम यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा छोटासा परिवार आहे. या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर गावातील सरपंच गणेश मडावी यांनी शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी केली आहे.



# नागपूरचेच महसूलमंत्री; मग त्यांच्या विभागात पदोन्नतीला विलंब का?-खासदार प्रतिभा धानोरकरांचा संतप्त सवाल

## कोकण विभागात प्रक्रिया पूर्ण, नागपूर विभागात रखडलेली; नायब तहसीलदार पदोन्नती त्वरित पूर्ण करण्याची खासदारांची आग्रही मागणी



**चंद्रपूर । राकेश शिंगरू**

नागपूरचे महसूलमंत्री असताना त्यांच्याच नागपूर विभागात नायब तहसीलदार पदोन्नती प्रक्रिया रखडतेय, हा दुजाभाव का. असा थेट सवाल करत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्राद्वारे जाब विचारला आहे. कोकण विभागात तीच प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली असताना, नागपूर विभागात मात्र ती दोन महिन्यांपासून मंत्रालयात प्रलंबित आहे, ही बाब गंभीर असल्याचे धानोरकर यांनी स्पष्ट केले.

नागपूर विभागात सध्या सुमारे ४५ नायब तहसीलदार पदे रिक्त असून, त्यामुळे एका अधिकाऱ्याकडे दोन ते तीन सर्कलचा अतिरिक्त कार्यभार आहे. परिणामी, नागरिकांच्या कामकाजास विलंब होत असून, शासनाच्या योजनांची अंमलबजावणीही प्रभावित होत आहे.खासदार धानोरकर यांनी पत्रात नमूद केले आहे की, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार पदांसाठी निवड यादी तयार करून ती मार्च २०२५ मध्येच शासनाकडे पाठवली होती. मात्र, ती अद्याप मंत्रालयीन स्तरावर प्रलंबित आहे, ही बाब प्रशासनातील उदासीनतेचे लक्षण असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कोकणमध्ये पदोन्नती दिल्या जातात, पण विदर्भात मात्र त्या प्रक्रियेला चालढकल का. असा सवाल करत धानोरकर यांनी नागपूर विभागाशी संबंधित कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला आहे. यासोबतच त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निवडणूक संदर्भातील अलीकडील निर्देशांचा उल्लेख करत नायब तहसीलदारांच्या रिक्त पदांचा संभाव्य परिणाम निवडणुकीच्या व्यवस्थापनावरही होऊ शकतो, असे म्हटले आहे. धोरणात्मक पातळीवर मुख्यमंत्र्यांनी १०० दिवसांच्या कृती आराखड्यात सर्व विभागातील रिक्त पदे भरण्याची ग्वाही दिली होती. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने तातडीने कार्यवाही करून पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करावी, अशी आग्रही मागणी धानोरकर यांनी केली आहे. शेवटी, जनतेची कामे वेळेवर मार्गी लागावीत व महसूल प्रशासन अधिक सक्षम व्हावे, यासाठी महसूलमंत्र्यांनी या प्रक्रियेवर वैयक्तिक लक्ष द्यावे, अशी ठाम भूमिका खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मांडली आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात रोजगार मेळावा संपन्न

## शेकडो बेरोजगारांनी घेतला लाभ


**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात १५ जुलैला महाविद्यालय तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता केंद्र चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिन आणि पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. या मेळाव्यामध्ये एकूण ९ उद्योग व कंपनी सहभागी झाल्या होत्या. ओमॅट वेस्ट प्रा. लि., चंद्रपूर के. एस.ग्रुप हैदराबाद, विदर्भ क्लिक १,सोल्युशन, चंद्रपूर, वैभव इंटरप्राइजेस, नागपूर, डिक्सॉन इंजीनियरिंग प्रा. लि. नागपूर, एस.बी.आय. लाइफ इन्शुरन्स चंद्रपूर फील्ड वर्कर, संसुर सृष्टी इंडिया प्रा. लि. चंद्रपूर,महाराष्ट्र कार्बन प्रा. लि. चंद्रपूर , धूत ऑटोमोटिव सिस्टम प्रा. लि. औरंगाबाद या नामवंत उद्योग आणि कंपनींनी या रोजगार मेळाव्यात सहभाग घेतला. महाविद्यालयातर्फे उमेदवारांची नोंदणी करून घेण्यात आली. एकूण ४४० उमेदवारांनी नोंदणी करून प्रत्यक्ष मुलाखती दिल्या. विविध उद्योगांतर्फे व कंपनीतर्फे एकूण १४३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.




विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोराचे अध्यक्ष मा. पुरुषोत्तम स्वान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मेळावा उद्घाटन सोहळ्यात तहसीलदार राजेश भांडारकर हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. जिल्हा कौशल्य विकास रोजगार मार्गदर्शन केंद्राच्या सहआयुक्त अनिसा तडवी आणि यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मेळावा आयोजनाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. नगरपरिषद भद्रावतीच्या मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळकी, संस्थेचे सहसचिव राजेंद्र गावंडे, संस्थेच्या सदस्या डॉ. मायाताई राजुरकर, उद्योजक गिरीश पदमावार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. भद्रावती शहरातील सुप्रसिद्ध उद्योजक पद्मावार यांनी प्रेरक मार्गदर्शक म्हणून उपस्थित उमेदवारांना रोजगार, रोजगारांच्या संधी आणि कौशल्य विकास यावर सखोल मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.सुधीर आस्टुनकर यांच्या नियंत्रणात पार पडलेल्या या मेळाव्यात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता चंद्रपूर चे सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेऊन हा मेळावा यशस्वी पार पाडला.

# स्वामी समर्थांच्या मंदिरात भाविकांची अलोट गर्दी; महिला-युवकांचा लक्षणीय सहभाग





**पारनेर । सुयश नरसाळे**

गायकवाड कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुवारी सकाळी आरतीच्या वेळी भाविकांची प्रचंड मांदियाळी जमली होती. विशेषतः महिला आणि युवक वर्गाची लक्षणीय उपस्थिती नजरेत भरणारी होती.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतही श्री स्वामी समर्थ महाराजांवरील श्रद्धा टिकवून ठेवणारा भक्तवर्ग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्यांच्या दिव्य जीवनचरित्राचे विविध पैलू भक्तांना आजही प्रेरणा देत आहेत. स्वामी समर्थ महाराजांची तेजस्वी शिष्यपरंपरा हा त्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण पैलू मानला जातो. त्यांच्या कोट्यवधी भक्तांसह शिष्यपरिवारही तितकाच प्रभावी आहे.

या परंपरेतील काही प्रमुख शिष्यांची नावे म्हणजे बीडकर महाराज, शंकर महाराज,

> **श्री स्वामी समर्थ महाराज केंद्रात आम्ही प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. गेल्या काही दिवसांपासून भाविकांची सेवा करत आहोत. भविष्यात अधिकाधिक भक्तगण मंदिराशी जोडले जावेत यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील.**
> **– बोरुडे , श्री स्वामी सेवेकरी**

काळबोवा (पुणे), नृसिंह सरस्वती (आळंदी), सीताराम महाराज (मंगळवेढे), साईबाबा (शिर्डी), देवमामलेदार (नाशिक), रांगोळी महाराज (मालवण), श्रीकृष्ण सरस्वती (कोल्हापूर), स्वामीसुत (मुंबई), बाळप्पा महाराज (अक्कलकोट), ब्रह्मनिष्ठ वामनबुवा (बडोदे), धोंडिबा पलुस्कर (पलुस) आणि गजानन महाराज (शेगाव) इत्यादी. या महान विभूतींचे चरित्र साधकांना सातत्याने स्फूर्ती प्रदान करते.

स्वामी समर्थ महाराजांच्या संकल्प दीक्षेचा उल्लेखही विशेष महत्त्वाचा आहे. कोणताही विधी न करता, केवळ संकल्पाच्या माध्यमातून शिष्याचा सर्वोच्च आध्यात्मिक उद्धार करणे, ही संकल्प दीक्षा म्हणून ओळखली जाते. अशा पवित्र संकल्पाने स्वामींनी असंख्य जीवांना जीवनमुक्तीच्या मार्गावर नेले, असे मानले जाते. काही ग्रंथांमध्ये साईबाबा व गजानन महाराज यांचा स्वामी समर्थ महाराजांचे शिष्य म्हणून उल्लेखही आढळतो.श्री स्वामी समर्थ ट्रस्टमार्फत येणाऱ्या भाविकांसाठी दर्शन व प्रसाद वितरणाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. सेवेकरी भाविकांच्या सेवेस तत्पर असून प्रत्येक गोष्ट अचूकतेने व निःस्वार्थ भावनेने पार पाडत आहेत.

# गर्दीचा गैरफायदा घेत सव्वा लाखांचे दागिने चोरले

## करमाळा पोलिसांच्या तपासातून चोरट्या महिलांचा पर्दाफाश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा एस.टी. बसस्थानकावर प्रवासी महिलांच्या गर्दीत गोंधळ उडवून, त्यांच्या पिशव्यांमधून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोन महिलांच्या टोळीचा छडा लावत करमाळा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत चोख कारवाई करून सव्वा लाखांचे दागिने हस्तगत केले आहेत. ही कामगिरी पोलिसांच्या तांत्रिक कौशल्य, संयमित तपास आणि सततच्या प्रयत्नांचे मूर्तस्वरूप ठरली आहे.१३ जुलै २०२५ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली. अंतरवड सावखेड (ता. करमाळा) येथील फिर्यादी महिला करमाळा एस.टी. स्टँडवर उतरत असताना गर्दीचा फायदा घेत दोन अनोळखी महिलांनी त्यांच्या पिशवीतील दागिने लंपास केले. या प्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच, तपासाची सूत्रे पोलीस निरीक्षक गणेश माने यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत काटेकोरपणे हलवली गेली.




सीसीटीव्ही फुटेज, घटनास्थळी उपस्थित असलेल्यांच्या साक्षी, बसस्थानक परिसरातील व्हिडिओ क्लिप्स आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीतून आरोपी महिलांची ओळख पटवण्यात आली. पोलिसांनी अत्यंत सूक्ष्म पद्धतीने आरोपींचा मागोवा घेत त्यांना ताब्यात घेतले आणि कसून चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून तब्बल १ लाख २५ हजार किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे वर्षा इंदुले चव्हाण (रा. तांदळे वडगाव, जि. अहमदनगर) आणि राधिका शुभम पवार (रा. नजीरखेड, ता. भोकरदन, जि. जालना) अशी आहेत. या दोघींनी मिळून काही दिवसांपासून अशा प्रकारच्या चोऱ्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून, पुढील तपासही त्या दृष्टीने सुरू आहे.

या कारवाईत पोलिस अधीक्षक डॉ. प्रशांत पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. स्थानिक पातळीवर पोलीस निरीक्षक गणेश माने यांच्यासह अंमलदार वाघमारे, पाटील, पो.ह.कॉ. शेख, पोकाँ. जळगावकर, गायकवाड, जाधव, शिंगणे, चव्हाण आदी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

करमाळा पोलिसांची ही वेगवान आणि अचूक कारवाई केवळ चोऱ्यांचे प्रतिबंधक उदाहरण नसून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही आश्वासक ठरली आहे. गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना काळजी घ्यावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# मोहोळ तालुक्यात व्हायरल फिव्हरचा प्रादुर्भाव

## सर्दी,खोकला,तापाने नागरिक त्रस्त

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यासह ग्रामीण भागात सध्या हवामानात सतत होणाऱ्या बदलामुळे व्हायरल फिव्हरने जोर धरला आहे. सर्दी, खोकला आणि तापाने अनेकांना ग्रासले असून, उपचारासाठी शासकीय, खासगी रुग्णालयांमध्ये गर्दी वाढताना दिसून येत आहे.

मागील आठ-दहा दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यानंतर उन्हाचा पारा वाढला होता. त्यानंतर अचानक वातावरण ढगाळ व दमट झाले. या हवामानातील बदलामुळे आजारांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश घरांमध्ये सर्दी-तापाच्या रुग्णांचे प्रमाण आढळून येत आहे. घरात एकाला लागण झाल्यास इतर सदस्यांनाही हळूहळू संसर्ग होत असल्याचे दिसून येत आहे.विशेषतः लहान मुलांमध्ये सर्दी, खोकल्याबरोबरच न्युमोनियाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे लहानग्यांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.



### धोक्याची सूचना

**ज्येष्ठ नागरिक, तसेच दमा, मधुमेह, उच्च रक्तदाब यासारख्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांनी विशेष काळजी घ्यावी. किरकोळ सर्दी, ताप, खोकला अंगावर न काढता त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन मोहोळ येथील विघ्नहर्ता हॉस्पिटलचे संचालक डॉ. अच्युत नरूटे आणि ओम हॉस्पिटल, अनगर येथील डॉ. संतोष गुजरे यांनी केले आहे.**

पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, अशा वातावरणात रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्याने आजार बळावले आहेत.

# शेतकऱ्यांचे हक्क नाकारले तर कारवाईला तयार रहा! मुंबई उच्च न्यायालयाचा चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

## ताडाळी एमआयडीसीतील पाइपलाइनमुळे जमिनीचे नुकसान; २३ जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ताडाळी एमआयडीसी येथील धारीवाल पॉवर स्टेशनसाठी टाकण्यात आलेल्या पाइपलाइनमुळे शेतकऱ्यांची शेती ध्वस्त झाली असून, भरपाई अद्याप न मिळाल्याने संबंधित शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यावर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांना २३ जुलैपर्यंत उत्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा स्पष्ट आदेश दिला आहे. यासोबतच, शेतकऱ्यांशी अन्याय खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट दम न्यायालयाने भर दिला.

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाळी एमआयडीसी परिसरात धारीवाल पॉवर स्टेशनने जलस्रोतासाठी वर्धा नदीपासून पाइपलाइन टाकली असून, ती अनेक ठिकाणी शेतजमिनीवरून गेली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान झाले आहे. परंतु, त्यांना कोणतीही भरपाई देण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर अंतुर्ला येथील अशोक कौरासे व इतर पीडित शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली.

या याचिकेवर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि सचिन देशमुख यांच्या खंडपीठासमोर बुधवारी सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांचे वकील अ‍ॅड. शिल्पा गिरटकर यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, संबंधित तहसीलदारांनी पंचनाम्यात जमीन नुकसानीचा योग्य उल्लेख केला नाही. उलट धारीवाल कंपनी आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यात संगनमत करून भरपाईच नाकारली गेली. त्यांनी न्यायालयाकडे ४,४४४ रुपये प्रतिमीटर दराने भरपाई देण्याची मागणी केली.पाइपलाइनबाबत माहिती देताना अ‍ॅड. गिरटकर यांनी सांगितले की, धारीवाल पॉवर स्टेशनसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी शिवधुऱ्यावरून पाणीपुरवठा करण्यास परवानगी दिली होती. मात्र, कंपनीने या परवानगीच्या पलीकडे जाऊन थेट शेतजमिनींतून सुमारे २० किलोमीटर लांबीची पाइपलाइन टाकली. ही पाइपलाइन अनेकवेळा फुटते, ज्यामुळे शेतपिकांचे सातत्याने नुकसान होते.या साऱ्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांना फटकारले असून, २३ जुलै ही शेवटची संधी समजा, असे स्पष्ट शब्दांत निर्देश दिले आहेत. या तारखेपर्यंत भरपाईप्रकरणी सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर न केल्यास कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल, असा संकेत न्यायालयाने दिला आहे.



# पत्रकार श्याम उपाध्याय यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाईची भाजपची मागणी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्वस्त धान्य दुकानांमधील तांदळाच्या काळाबाजाराचा पर्दाफाश करणाऱ्या दैनिक लोकमत समाचारचे पत्रकार श्याम उपाध्याय यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी भारतीय जनता पार्टी, वर्धा जिल्हा यांच्या वतीने करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर दि. १७ जुलै रोजी मुंबई येथे राज्याचे गृहराज्यमंत्री आणि वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन भाजप शिष्टमंडळाने निवेदन दिले. या निवेदनात वर्धा जिल्ह्यातील धान्य माफियांच्या वाढत्या दहशतीला आवर घालण्यासाठी तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.८ जुलै २०२५ रोजी रात्री वर्धा-पुलगाव मार्गावरील सालोड गावाजवळ ही दुर्दैवी घटना घडली. श्याम उपाध्याय यांचे वाहन अचानक बिघडल्यामुळे ते रस्त्यावर उभे होते. त्यावेळी काही संशयित धान्य माफियांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या घटनेमुळे संपूर्ण पत्रकारिता क्षेत्रात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, या हल्ल्यामागे स्वस्त धान्य दुकानांतील तांदळाच्या गैरव्यवहारामध्ये गुंतलेले माफिया असल्याची शक्यता असून, यामध्ये काही ठेकेदार, दुकानदार तसेच स्थानिक अधिकाऱ्यांचेही संगनमत असू शकते.या शिष्टमंडळात वर्धा जिल्ह्यातील भाजपचे सर्व मंडळ अध्यक्ष, मोर्चांचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.भाजपने स्पष्ट केले की, जर प्रशासनाने या गंभीर प्रकरणात त्वरीत कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलनात्मक भूमिका घेण्यात येईल.



### जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या नेतृत्वाखालील भाजप शिष्ट मंडळाने निवेदनात खालील मागण्या मांडल्या :

*हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी.
*वर्धा जिल्ह्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांची चौकशी करण्यात यावी.
*काळाबाजार करणाऱ्या माफियांवर कठोर कारवाई होण्यासाठी विशेष मोहीम राबवावी.
*पत्रकार श्याम उपाध्याय यांना तातडीने सुरक्षा प्रदान करण्यात यावी.
*पत्रकारिता क्षेत्राचे स्वातंत्र्य व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी.

# बेमुदत उपोषणाला शिवसैनिकां कडून रक्तदान करून पाठिंबा

**पुलगाव । प्रतिनिधी**



पुलगाव, नाचणगाव, गुंजखेडा या परिसरातील रखडलेली कामे, रेल्वे गेटवरील अडथळे, अपुऱ्या सुविधा असलेला सरकारी दवाखाना व सामान्य नागरिकांच्या इतर समस्या या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अंकुश कोचे व गजानन पचारे यांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांना मनिष साहु, बंटी ढगे, संदीप कुचे, प्रफुल कुंभरे, विक्की पाखरे यांनी साखळी उपोषणातून साथ दिली आहे.या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे रक्तदान करून पाठिंबा देण्यात आला. दि. १७ जुलै रोजी तब्बल ४० शिवसैनिकांनी रक्तदान करत या उपोषणाला ऐक्याची भावना व्यक्त केली.

रक्तदान करणाऱ्यांमध्ये नरेश ठाकुर, संदीप कुचे, प्रफुल कुंभरे, शेख अखिल, सुधीर काकडे, यश धाबेकर, सतीश पाटील, विशाल चौधरी, वैभव डांगे, यश डांगे, सुमित पाटील, सय्यद शाहरुख, नारायण कुर्जेकर, प्रविण पांडे, गजानन धानोरकर, प्रविण कुमार, अनिल गावंडे, राजेंद्र अलोणे, सार्थक नादेकर, मारोती कोडेकार, तुषार वानखडे, मनिष तिवरे, आशिष बदनोरे, सुमेध उके, शुभम कोल्हे, सुरज मंदारे, कुणाल कैलुके, राजेंद्र ढाकुळे, जय ओडणकर, ओम कोयणकर, निखिल साखुरे, नितेश मोहोड, कपिल मोटघरे, निखिलेश साहु, किशोर जयस्वाल, कुनाल वानकर, रमेश जयस्वाल, रतन सारदने, पंकज मानकर, अविनाश निघोट, व्यंकटेश्वर मंडारी, निखिल आटे.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा प्रमुख आशिष पांडे यांच्या आदेशानुसार शहर प्रमुख संदीप कुचे यांच्या नेतृत्वात पुढील शिवसैनिकांनी संयोजन व सहकार्य केले :

नरेश ठाकुर, प्रफुल कुंभरे, प्रकाश मेटे, सुधीर काकडे, सर्वेश धाबेकर, नितीन तुर्के, विशाल चौधरी, सलीम हुसेन, विद्याधर माथने, नितेश मोहोड, अखिल शेख, सतीश पाटील, निलेश अवथे, किशोर डफळे, वैभव डांगे, यश धाबेकर.या माध्यमातून प्रशासनाला जागे करण्यासाठी शिवसेनेने एक नवे आंदोलनात्मक रूप उभे केले असून नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना होईपर्यंत संघर्ष सुरू राहणार असल्याचा निर्धार करण्यात आला आहे.

# स्वातंत्र्य सेनानी पांडुरंग गोसावी यांचे योगदान अत्यंत मोलाचे-पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वातंत्र्य सेनानी पांडुरंग गोसावी यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. ते वर्धा जिल्ह्याचे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या नावाने ग्रंथालय सुरू करण्यात येईल, असे प्रतिपादन वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खाणीकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.सेवाग्राम येथील चरखा भवन येथे थोर स्वातंत्र्य सेनानी पांडुरंग गोसावी गुरुजी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पालकमंत्री डॉ. भोयर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. राजेंद्र गवई होते.



कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. डी. एस. सावंत (मुंबई), मा. गोकुळ पांडे, दीपक पाटील, डॉ. पोद्धार आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात 'स्वातंत्र्य सेनानी पांडुरंग गोसावी स्मृती ग्रंथाचे' प्रकाशन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सेवाग्रामचे सुपुत्र व साहित्यिक डॉ. प्रदीप आगलावे यांचा त्यांच्या पत्नी डॉ. सरोज आगलावे यांच्यासह 'स्वातंत्र्य सेनानी गोसावी गुरुजी फाउंडेशन' तर्फे मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपणाने करण्यात आली, ज्याद्वारे गोसावी गुरुजींच्या स्मृतीला आदरांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गौतम गोसावी यांनी केले. सुभाषिणी मनोहर यांनी संचालन तर डॉ. तेजस्विनी गोसावी यांनी आभार प्रदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिरामण गवई, सुधाकर गोसावी, वसुंधरा भगत, रमेश जामलेकर व रवी नाईक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आ.मुनगंटीवार यांच्यामुळे मार्गी लागणार चंद्रपूर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजना; प्रलंबित योजनेसाठी पाणीपुरवठा मंत्र्यांकडे भक्कम पाठपुरावा

### प्रलंबित पाणीपुरवठा योजनेसाठी लवकरच बैठक; निधी उपलब्धतेचे दिले पाणीपुरवठा मंत्र्यांनी आश्वासन

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे होणार स्वतंत्र बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या भक्कम पाठपुराव्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पाणीपुरवठा मंत्र्यांनी या विषयावर स्वतंत्र बैठक घेण्याची ग्वाही दिली आहे. त्यानिमित्ताने आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या आणखी एका लोककल्याणकारी विषयाला यश प्राप्त होणार आहे.केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत ' हर घर पाणी' या योजनेत निर्धारित वेळेत प्रत्येक घरात पाणी पोहोचवण्याची योजना आखण्यात आली. या योजनेला वेळ लागत आहे. बल्लारपूर मतदारसंघ तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित पाणीपुरवठा योजनांसाठी ४७ कोटी रुपयांची तात्काळ तरतूद करावी. कार्यकारी अभियंत्यांचे रिक्त पद त्वरित भरावे, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत केली. यावर पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत चंद्रपूर जिल्ह्यासाठी वेगळी बैठक घेऊन प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

आमदार सुधीर मनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित पाणीपुरवठा योजनेचे आकडेवारीसह अभ्यासपूर्ण विवेचन केले. ही योजना प्रत्येक नागरिकासाठी किती आवश्यक आहे, त्यात कशा अडचणी येतात, अधिकाऱ्यांच्या पातळीवर कसा विसंवाद होतो यावर विस्तृतपणे भाष्य केले. ते म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारने २०२६ पर्यंत प्रत्येकाच्या घरी शुद्ध पाणी जावे, हा विचार मांडला. पण प्रलंबित योजनांमुळे या मोहिमेत अडसर निर्माण होत आहे. त्यादृष्टीने पाणीपुरवठा योजनेची कामे प्राधान्याने व्हायला हवीत.' कार्यकारी अभियंत्याचे पद रिक्त ठेवण्यात आले आहे. ते तात्काळ भरण्यात यावे, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. मंत्रालयात बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील गावाच्या पाणीपुरवठा योजने संदर्भात बैठक घेण्यात यावी. तसेच एक बैठक चंद्रपूरला घेतली जावी. रखडलेले काम सुरू होण्यासाठी दोन महिन्यात ४३ कोटी रुपये उपलब्ध करावे, या मागण्यांचाही यामध्ये समावेश होता.



### आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला यश

पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी आ. मुनगंटीवार यांच्या प्रश्नांवर उत्तर देताना योजनांच्या संदर्भातील प्रगती आणि अडचणी संदर्भात विवेचन केले. तसेच बल्लारपूर मतदारसंघ आणि चंद्रपूर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात तात्काळ बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येईल आणि निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले.

# वृक्षारोपण करून साजरा केला अध्यक्ष रवि शेंडे यांचा वाढदिवस

**देवळी । प्रतिनिधी**

लोक शिक्षण मंडळ, देवळीचे अध्यक्ष रवि शेंडे यांचा वाढदिवस स्थानिक जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय देवळी येथे वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी शाळा परिसरात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून रवि शेंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उत्साहाने सहभाग घेतला.



सायंकाळी अध्यक्ष रवि शेंडे यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जनता प्राथमिक शाळा, जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, खाजगी प्राथमिक शिक्षक संघटना, जुनी पेन्शन संघटना, तसेच गांधीग्राम महाविद्यालय यांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात लोक शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. सुनिता शेंडे यांच्या हस्ते औक्षण व स्वागताने झाली. त्यानंतर प्राचार्य धर्मेश झाडे, उपमुख्याध्यापक सुरेंद्र उमाटे आणि पर्यवेक्षक भाऊराव जाधव यांच्या उपस्थितीत शिक्षकांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून रवि शेंडे यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर अध्यक्ष शेंडे यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. या वेळी महेंद्र सालंकर, पांडुरंग भालशंकर, वाघमारे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगताप, प्रमोद खोडे, सुरेश बरे, महेंद्र झाडे, कांचन उमाटे आदींसह सर्व मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मिलिंद भागवत यांनी केले तर आभार प्रदर्शन कांचन उमाटे यांनी मानले.

# बारामती तालुक्याच्या पूर्व भागात आडसाली ऊस लागवड सुरू झाली

### बारामतीच्या पूर्व भागात आडसाली ऊस लागवड़ीला वेग

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्याच्या पूर्व भागात आडसाली ऊस लागवडीचा हंगाम सध्या जोमात सुरू अहे.शेतकर्यांची शेतात चांगलीच लगवग पाहायलामिळत आहे. यंदा मे-जून महिन्यात समाधान कारक पाऊस झाल्याने निरा खोऱ्यातील जमिनी भिजल्या असून, शेतकरी आडसाली ऊस लागवडी कडे वळाले आहेत. विशेषतः श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील पिंपळी, लिमटेक,कऱ्हेरी, ढेकळवाडी, खताळ पट्टा सोनगाव, काटेवाडी परिसरातील शेतकरयांनी १५ जुलैची शेवटची तारीख लक्षात घेऊन लागवडीला वेग दिला आहे. बहुसंख्य शेतकरी एक डोळा पद्धतीने लागवड करत आहेत.या पद्धतीमुळे लागवडीचा खर्च कमी होतो, असे



शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. निरा डावा कालव्यात पालखी सोहळयाच्या पार्श्वभूमीवर पाणी सोडण्यात आल्याने सिंचनाची सोय झाली आहे. पावसाने काहीसा ब्रेक घेतल्यामुळे लागवडीच्या कामाला आणखी गती मिळाली आहे.

या वर्षी श्री छत्रपती कारखाना प्रशासना कडून यंदा -ख (कृत्रिम बुद्धिमत) तंत्रज्ञानाचा वापर ऊस शेतीत करण्या वर भर दिला जात आहे. या तंत्र ज्ञानामुळे उत्पादनात वाढ आणि खर्चात कपात होत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे अनेक शेतकरी या वर्षी -ख आधारित सल्ल्याचा अवलंब करत आहेत.ऊस लागवड पर्व हंगामी, आडसाली व रब्बी अशा तीन हंगामात केली जाते. यामध्ये आडसाली हंगाम (जुलै - ऑगस्ट) हे पीक हवामानासाठी अनुकूल असल्याने उसाची जोमदार वाढ होते. सुमारे१६-१८ महिन्यांच्या काला वधीत दोन पावसाळे लाभल्यामुळे उत्पादन अधिक मिळते. आजच्या सिंचन परिस्थितीत क्षेत्र वाढवण्या पेक्षा उत्पादन क्षमता वाढवणे महत्त्वचे आहे, असे काटेवाडीतील शेतकरी संजय मारुतराव काटे यांनी सांगितले.

# कोल वॉश नंतरचा चांगला कोळसा 'रिजेक्ट' म्हणून विकला जातोय-आ.किशोर जोरगेवार

## विधानसभेत मांडला मुद्दा,१३ हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप




**चंद्रपूर | प्रतिनिधी**
महाजेनकोच्या वॉशरीजद्वारे 'कोल वॉश' प्रक्रियेनंतर तयार होणारा चांगल्या दर्जाचा कोळसा जाणीवपूर्वक 'रिजेक्ट कोल' म्हणून दर्शवून खुल्या बाजारात विकला जात असल्याचा गंभीर आरोप आमदार किशोर जोरगेवार यांनी आज विधानसभेत उपस्थित केला. हा मोठा भ्रष्टाचार असुन याची चौकशी करण्याची मागणी यावेळी औचित्याच्या मुद्दयावर बोलतांना त्यांनी अधिवेशनात केली आहे.

वेकोलि, एमसीएल, एसईसीएल, एमईसीएल आणि एससीसीएल या कंपन्यांच्या खाणींमधून दरवर्षी १३ कोटी ७८ लाख टनांपेक्षा अधिक कोळसा काढला जातो. महाजेनकोने यातील कोळशाची गुणवत्ता वाढवण्यासाठी खासगी वॉशरीजना कोळसा धुण्याचे कंत्राट दिले असून, वॉशरीजमधून तयार होणार्या कोळशाची वाहतूक करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडे देण्यात आली आहे. मात्र, वॉशरीजकडून तयार होणारा उच्च दर्जाचा कोळसा 'रिजेक्ट कोल' म्हणून नोंदवला जातो आणि त्याची किंमत कमी दाखवून तो खुल्या बाजारात विकला जात आहे. एकूण २ कोटी ७५ लाख ७६ हजार टन कोळसा अशा पद्धतीने खासगी कंपन्यांना विकण्यात आल्याचे समोर आले असून, त्याचा बाजारभाव सरासरी ५ हजार रुपये प्रति टन आहे. त्यामुळे एकूण गैरव्यवहाराची रक्कम १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी बोलतांना म्हटले आहे.या प्रकारामुळे महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीला मोठा फटका बसत असून हा राज्यातील आतापर्यंतचा सर्वात मोठा कोळसा घोटाळा असल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले. शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात असा गैरव्यवहार टाळण्यासाठी कोल वॉशरीज थेट विद्युत प्रकल्पांच्या परिसरातच स्थापन कराव्यात, अशी मागणीही त्यांनी यावेळी बोलतांना केली आहे.

# हा तपासणी नाका की भ्रष्टाचाराचं प्रवेशद्वार ?

**चंद्रपूर जिल्ह्यातील लक्कडकोट तपासणी नाका सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. मात्र ही चर्चा आर.टी.ओ.च्या कामकाजातील पारदर्शकतेवर न होताच, त्या विभागात सुरू असलेल्या अन्यायकारक कारभारावर केंद्रित झाली आहे. याच केंद्रात सापडले आहेत आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार. ट्रकचालकांकडून खंडणी मागितल्याचा आणि शासकीय अधिकाऱ्याला धमकी दिल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला असून, संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल झाला आहे. परंतु घटनास्थळी घडलेली वस्तुस्थिती आणि तिचा व्हिडिओ समोर आल्यानंतर हा प्रकार केवळ खोटा आरोप नसून, एक योजनाबद्ध राजकीय आणि प्रशासकीय सूडकारवाई असल्याचे स्पष्टपणे लक्षात येते.**

लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा, प्रशासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याचा आणि भ्रष्टाचाराला वाचा फोडण्याचा अधिकार आहे. मात्र जेव्हा या अधिकाराचा वापर करणाऱ्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं जातं, तेव्हा ती केवळ एखाद्या व्यक्तीपुरती मर्यादित राहणारी बाब राहत नाही, तर ती संपूर्ण व्यवस्थेच्या अधोगतीचं लक्षण ठरते.

मयूर राईकवार हे पत्रकार नाहीत, आणि त्यांनी तसा कोणताही दावा केलेला नाही. ते राजकीय पदावर कार्यरत असलेले एक जबाबदार कार्यकर्ते आहेत. त्यांनी आपल्या वाहनाने प्रवास करताना लक्कडकोट तपासणी नाक्याजवळ काही संशयास्पद हालचाली पाहिल्या आणि त्या बाबत अधिकाऱ्यांकडे प्रश्न उपस्थित केला. हे संपूर्ण संभाषण त्यांनी व्हिडिओ स्वरूपात रेकॉर्ड केलं असून, तो त्यांनी फेसबुकवर सार्वजनिकपणे प्रसारित केला आहे. त्या व्हिडिओत ना धमकी आहे, ना अश्लील भाषा, ना शिवीगाळ. उलट, एक सजग नागरिक प्रशासनाला प्रश्न विचारतो आहे एवढाच त्याचा गुन्हा.या प्रकरणातून आणखी गंभीर बाब समोर येते जेव्हा कोणी भ्रष्ट व्यवस्थेला जाब विचारतो, तेव्हा त्याच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्याचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो. ही एखाद्या आरटीओ अधिकाऱ्याची वैयक्तिक सूडभावना नसून, तपासणी नाक्यांवरील भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून आवाज दाबण्याचा जुना, पण परिणामकारक खेळ आहे.




लक्कडकोट सारख्या तपासणी नाक्यांवर आरटीओ विभागाकडून केवळ वाहन तपासणी केली जाते, असा सार्वजनिक समज राहिलेला नाही. हे नाके दैनंदिन लाचलुचपतीचे 'सिस्टिमॅटिक पॉइंट' झाले आहेत, हे कोणताही ट्रकचालक किंवा प्रवासी ठामपणे सांगू शकतो. चालकांकडून परवाने, कागदपत्रे, वजन, वेळ आणि मालाच्या स्वरूपाच्या नावाखाली अनधिकृत रक्कम उकळली जाते. या प्रकाराला कोणी विरोध केला, तर त्याला गुन्हेगार ठरवले जाते हे केवळ गैरप्रकार नसून, व्यवस्थेच्या नाकर्तेपणाचं उघड चित्र आहे.यामध्ये आणखी एक चिंताजनक प्रवृत्ती दिसून येते तक्रारीला 'संवेदनशील' चे स्वरूप देण्यासाठी महिला अधिकारी असल्याचा मुद्दा पुढे केला जातो. त्यामध्ये खोटे आरोप लावणे, चुकीच्या भावनिक आभासात कार्यकर्त्याला अडकवणे, हा प्रकार महिलांच्या खऱ्या सन्मानालाही गालबोट लावणारा आहे. महिला अधिकारी असणं ही जबाबदारीची भूमिका आहे, ती सतत बिनचूक असल्याचं गृहीतक मानणं चुकीचं आहे. प्रशासनाचा हेतू जर खरोखर सत्यशोधनाचा असेल, तर घटनास्थळी उपस्थित असलेल्या साक्षीदारांचे निवेदन, व्हिडिओ, सीसीटीव्ही फूटेज, कॉल रेकॉर्ड अशा सर्व पुराव्यांचा वापर करून तपास करणे अपेक्षित आहे. पण येथे एका अधिकाऱ्याच्या तोंडी निवेदनावर तात्काळ गुन्हा दाखल करणं हीच पद्धत अंगीकारण्यात आली आहे. आज जर मयूर राईकवार यांच्यासारख्या एका सामाजिक कार्यकर्त्यावर खोटा गुन्हा दाखल करून त्यांची प्रतिमा मलीन केली जात असेल, तर उद्या एखादा ट्रकचालकदेखील प्रशासनाच्या अन्यायाविरोधात तोंड उघडण्याचं धाडस करणार नाही. ही केवळ एखाद्या व्यक्तीविरोधात चाललेली कारवाई नाही, तर ती लोकशाही मूल्यांवरचा सरळ आणि खतरनाक हल्ला आहे.सत्तेच्या गोटात बसलेल्यांनी ही बाब समजून घ्यायला हवी की प्रशासन हा जनतेचा सेवक आहे, मालक नव्हे. प्रश्न विचारणाऱ्याला आरोपी बनवणं म्हणजे खऱ्या गुन्हेगारांना संरक्षण देण्याचा प्रयत्नच ठरतो.या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, स्वतंत्र आणि सखोल. चौकशी झाली पाहिजे. तपासणी नाक्यांवर पारदर्शकता आणण्यासाठी सीसीटीव्ही फूटेजचे थेट प्रक्षेपण, तपासणी प्रक्रिया संगणकीकृत करणे आणि नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे ही आजच्या काळाची निकड आहे.हा लढा केवळ मयूर राईकवार यांचा नाही. तो प्रत्येक विचार करणाऱ्या नागरिकाचा आहे. जो बोलतो, जाब विचारतो आणि अन्यायाविरुद्ध उभा राहतो. मयूर राईकवार यांच्यावर दाखल केलेला गुन्हा जितका खोटा आहे, तितकाच तो लोकशाहीला गप्प करण्याचा प्रयत्नही आहे. म्हणूनच, हा लढा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, पारदर्शक प्रशासनाचा आणि सत्याच्या बाजूने उभं राहण्याचा आहे.

### मुल तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक संपन्न

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक आढावा



**मुल | प्रतिनिधी**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे राज्यातील सर्वच राजकीय पक्ष निवडणूक तयारीला लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुल तालुकास्तरीय संघटनात्मक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. मात्र, अलीकडेच कोर्टाने निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यामुळे निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली असून, सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या स्तरावर नियोजनास गती दिली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या सूचनेनुसार मुल तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत मुल शहर आणि ग्रामीण भागात पक्षाची विचारधारा पोहोचवण्यावर, तसेच जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करत पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर देण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार होते. त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पक्षाच्या माध्यमातून जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका बजावा. विधायक कामांद्वारे जनतेच्या मनात विश्वास निर्माण करून पक्षाची पकड बळकट करणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस मुल शहराध्यक्ष आकाश येसनकर, दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष रोहित कामडे, महिला तालुका अध्यक्षा शीतलताई वाढगुरे, महिला आघाडीच्या बल्लारपूर विधानसभा अध्यक्षा संगीताताई गेडाम, महिला शहर अध्यक्षा धाराताई मेश्राम, वासुदेवजी पीपरे, माला शेंडे, सुवर्णाकक्षी रामटेके, रोजगार व स्वयंरोजगार शहराध्यक्ष रजत कुकडे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष आशु खान, सोहेल भसारकर, शंकर पुरमशेट्टीवार, गौरव शामकुळे, राहुल भघमारे, आदित्य गेडाम, रोहित शेंडे, यश गेडाम आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जन्मतः अंध असलेल्या नम्रता गुरवचं संगणक शिक्षणात दैदिप्यमान यश

### एमएससीआयटी परीक्षेत मिळवले ८७ टक्के गुण



**मोहोळ | प्रतिनिधी**
जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतीही अडचण पार करता येते, हे मोहोळ तालुक्यातील अनगर येथील नम्रता बापू गुरव हिने सिद्ध करून दाखवले आहे. जन्मतः अंध असूनही दहावीच्या परीक्षेत लेखनिकाच्या मदतीने ७० टक्के गुण मिळवत तिने संगणक क्षेत्रात यश मिळवण्याचा निर्धार केला आणि एमएससीआयटी परीक्षेत तब्बल ८७ टक्के गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधले.

बापू आणि मंगल गुरव या दांपत्याच्या पोटी जन्मलेल्या नम्रताने अंधत्वावर मात करत मोहोळमधील हायटेक कम्प्युटर्स संस्थेमार्फत संगणक प्रशिक्षण घेतले.

संस्थेतील शिक्षक पांडुरंग माने आणि भाग्यश्री माने या दाम्पत्याने तिला तांत्रिक ज्ञान देण्याचे महत्त्वाचे काम केले. स्क्रीन रीडर सॉफ्टवेअरच्या मदतीने तिने संगणकाचे मूलभूत व सखोल ज्ञान मिळवले. इंटरनेटचा वापर, ई-मेल पाठवणे, ऑनलाइन सेवा वापरणे यासारख्या बाबतीतही ती अत्यंत सफाईदारपणे काम करते.

फक्त शिक्षणातच नव्हे, तर क्रिडा व योगक्षेत्रातही नम्रताची उल्लेखनीय कामगिरी आहे. धावणे, लांब उडी, पासिंग बॉल यासारख्या क्रीडा प्रकारात तिने आतापर्यंत ११ पदके आणि प्रमाणपत्रे मिळवली आहेत. योगाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी गाझियाबाद येथे तिची निवड झाली होती, मात्र काही वैयक्तिक कारणांमुळे तिला सहभागी होता आले नाही. भविष्यात अशी संधी मिळाल्यास आपण नक्की सहभागी होईन, असा आत्मविश्वास ती व्यक्त करते.

सध्या ती आळंदी येथे अकरावी (कला शाखा) मध्ये शिक्षण घेत आहे.नम्रता अंध असल्याने तिच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू नये याची आम्ही काळजी घेतली. योग्य शाळेची निवड करून तिच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न केले. आज ती इथपर्यंत पोहोचली आहे, हे आमच्यासाठी अत्यंत समाधानकारक आहे, असे तिचे पालक मंगल व बापू गुरव यांनी सांगितले.

नम्रतेच्या या यशामागे तिची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि तांत्रिक साधनांची योग्य मदत कारणीभूत ठरली.शारीरिक मर्यादा कधीच मनोबलापेक्षा मोठ्या नसतात, हे नम्रताने आपल्या यशातून दाखवून दिले आहे.

# शंकरपूरचे उपसरपंच अशोक चौधरी यांचा इशारा : १६ ऑगस्टला पंचायत समिती चिमूर येथे आत्मदहन करणार

**चिमूर | प्रतिनिधी**
चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) वैयक्तिक सिंचन विहीर बांधकाम पूर्ण करूनही लाभार्थ्यांना आजपर्यंत एकही रुपया मिळालेला नाही. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असून, १० ऑगस्ट २०२५ पर्यंत अनुदानाच्या रकमांचे वाटप न झाल्यास १६ ऑगस्ट रोजी पंचायत समिती चिमूरच्या आवारात आत्मदहन करणार, असा गंभीर इशारा ग्रामपंचायत शंकरपूरचे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांनी दिला आहे.शंकरपूर गावात सन २०२३-२४ मध्ये नरेगा योजनेअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर बांधकामाच्या योजना राबविण्यात आल्या होत्या. प्रत्येक लाभार्थ्यास अंदाजे चार लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले होते. विहिरींचे बांधकाम पूर्ण झाले असूनही अद्याप अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झालेली नाही.

शेतकऱ्यांनी आपल्या खिशातून खर्च करत विहिरीचे काम पूर्ण केले आहे. परंतु अनुदान मिळालेलं नसल्याने त्यांची आर्थिक स्थिती ढासळली आहे. संबंधित यंत्रणांकडे वेळोवेळी पंचायत समिती चिमूरमध्ये पत्रव्यवहार व निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात आला. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

या मुद्द्यावर उपसरपंच अशोक चौधरी यांनी १० ऑगस्ट २०२५ पर्यंत विहीर बांधकाम लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान



जमा न झाल्यास, मी स्वतः १६ ऑगस्ट रोजी पंचायत समिती चिमूर येथे आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्यामुळे शासकीय यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अशोक उईके, जिल्हाधिकारी चंद्रपूर, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उपजिल्हाधिकारी (रोहयो), तसेच पोलीस निरीक्षक चिमूर यांना पाठविण्यात आल्या आहेत.मागेल त्याला विहीर या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या योजनेचा उद्देश म्हणजे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, गावातच मजुरांना काम उपलब्ध करून देणे आणि शेतीला सिंचनाची सोय उपलब्ध करणे हा होता. मात्र, या योजनेतील लाभार्थ्यांना वेळेत अनुदान न मिळाल्याने योजना अर्थहीन ठरत असून, ग्रामीण भागातील शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

# जुना धामणगावच्या विकासासाठी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांचे महत्त्वपूर्ण योगदान-परीक्षित जगताप

**धामणगाव रेल्वे | प्रशांत मुन**
जुना धामणगाव परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या कार्यकाळात राबविण्यात आलेल्या विविध योजना व विकासकामांची आजही ठळक नोंद घेतली जाते. त्यांच्या कार्यकाळात जुना धामणगावसाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करून आणण्यात आली होती, असे युवक काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे महासचिव परीक्षित जगताप यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदार शी बोलताना सांगितले.त्यांनी सांगितले की, वीरेंद्र जगताप यांच्या कार्यकाळात आमदार निधी, जिल्हा नियोजन निधी, विशेष निधी २५-१५ आणि जनसुविधा योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देत, कोणत्याही मूलभूत सुविधांपासून वंचित असलेल्या लेआऊट्समध्ये प्राथमिकतेने रस्ते व नाल्यांचे बांधकाम करण्यात आले. नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करून कामांची अंमलबजावणी केली गेली.

तसेच त्यांनी विद्यमान आमदारांच्या कार्यशैलीवर टीका करताना म्हटले की, मागील सहा वर्षांतील विकासकामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट राहिला आहे. केवळ कंत्राटदारांना लाभ होईल अशी कामे करण्यात आली असून नागरिकांना त्यातून कोणतीही ठोस सुविधा मिळालेली नाही.



कामांच्या गुणवत्तेचा अभाव आणि नियोजनशून्य अंमलबजावणीमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.दैनिक सह्याद्रीचा राखणदार शी बोलताना परीक्षित जगताप यांनी पुढे सांगितले की, वीरेंद्र जगताप यांच्याकडून जुना धामणगावसाठी राबविण्यात आलेली विकासकामे ही नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारी होती. पाणी, रस्ते, नाले, विद्युत व आरोग्य सुविधांचा विकास करण्यात त्यांच्या कार्यकाळात विशेष भर दिला गेला.परीक्षित जगताप यांच्या या वक्तव्यामुळे स्थानिक राजकारणात नव्याने चर्चेला उधाण आले असून नागरिकांमध्येही गतकालीन आणि सध्याच्या विकासकामांची तुलना होऊ लागली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# बदलापूर–मुरबाड रस्त्याची दुरवस्था; काँक्रीटीकरणाचे काम संथगतीने सुरू, वाहनचालक व नागरिक त्रस्त

**बदलापूर । प्रतिनिधी**

अंबरनाथ आणि मुरबाड तालुक्यांच्या सीमेवर वसलेले बारवी धरण आणि परिसर हा पावसाळी पर्यटनासाठी आकर्षणाचे केंद्र आहे. याच मार्गावरून दरवर्षी हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी ये–जा करत असतात. बदलापूर–मुरबाड रस्ता हा या भागातील नागरिकांसह पर्यटकांसाठीही अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र सध्या या रस्त्याची दुरवस्था झाली असून, सुरू असलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

बदलापूरहून मुरबाडकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर राहटोली ते मुळगाव, पुढे सोनावळे आणि पिंपळोली ते बारवी धरण या पट्ट्यात सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम गेल्या सहा महिन्यांपासून सुरू आहे. मात्र हे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने, खोदून ठेवलेल्या रस्त्यावरून वाहनचालकांना अत्यंत सावधपणे आणि कसरत करत प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावरून मुरबाडसह माळशेज घाट, शिर्डी, अहमदनगर, शहापूर आणि नाशिककडे जाणाऱ्या मोठ्या प्रमाणातील वाहनांची वर्दळ असते. परंतु काँक्रीटीकरणाच्या कामासाठी रस्त्याचा काही भाग सतत खोदलेला असून, विशेषतः पिंपळोली ते बारवी धरणदरम्यानच्या फक्त एक किलोमीटर अंतराच्या कामालाही महिने उलटून गेले तरी पूर्णत्व आलेले नाही.





## प्रतिनिधींनी मौन का पाळले?

कामाच्या संथगतीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी गप्प का आहेत, असा सवाल नागरिक विचारत आहेत.या रस्त्याची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, चांगल्या दर्जाचे असावेत आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले जावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## अपघातांचा धोका वाढतोय

रस्त्याच्या उंचसखल भागात सध्या चढ–उतार कमी करून रस्ता समपातळीवर आणण्याचे कामही सुरू आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्याचा एक भाग खोदलेला असून, दुसऱ्या भागावरून वाहने चालवावी लागत आहेत. रात्रीच्या वेळी या ठिकाणी अपघाताची शक्यता वाढली असून, वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शिवाय पावसामुळे रस्त्यावर चिखल साचतो, त्यामुळे दुचाकीस्वारांनाही मोठा त्रास होत आहे.

## प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिकांचा संताप

या ठिकाणी काही भागात एकावेळी फक्त एकच वाहन जाऊ शकते, त्यामुळे वाहतूक कोंडीही निर्माण होते. रस्त्यावर कोणतीही दिशादर्शक पाटी अथवा पर्याप्त प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्री प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरते.या रस्त्याचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)च्या अखत्यारीत असून, महामंडळाच्या वतीने वाहनचालकांना रस्ता सावकाश वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र नागरिकांचा प्रश्न आहे की, काम संथगतीने सुरू असल्याने आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना नसल्याने अपघात टळणार तरी कसे.

# काटवान परिसरात सचिन देसले यांची झंझावाती कारकीर्द
## नव्या गट रचनेनंतर कासारे गटातून रणशिंग फुंकले

**धुळे (उमाकांत अहिरराव)–साक्री तालुक्यातील कासारे गटातून नव्याने झालेल्या गट रचनेनंतर सचिन देसले यांनी राजकीय रणभूमीत आपले रणशिंग मोठ्या आत्मविश्वासाने फुंकले असून, काटवान परिसरात त्यांचा प्रभाव आणि नेतृत्वक्षमता ठळकपणे दिसून येत आहे.सचिन देसले हे केवळ राजकीय नेते नसून, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रभावी कार्यकर्ता म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख आहे. माजी खासदार व संसदरत्न पुरस्कार विजेती हिना गावित आणि माजी मंत्री विजयकुमार गावित यांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात.**



देसले यांनी गेल्या अनेक वर्षांपासून काटवान व परिसरातील गोरगरीब, उपेक्षित आणि वंचित घटकांसाठी अविरत कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रातील मदत, आरोग्य सुविधा, सामाजिक समस्या सोडविणे – प्रत्येक ठिकाणी त्यांची उपस्थिती व सक्रिय सहभाग दिसून येतो. नव्या गट रचनेच्या पार्श्वभूमीवर जनतेत असलेली त्यांची लोकप्रियता, कार्यकर्त्यांचे निष्ठावान समर्थन आणि सेवाभावी वृत्ती या बळावर त्यांनी आपले राजकीय बस्तान अधिक मजबूत केले आहे. काटवान परिसरात त्यांच्या कार्याने विशिष्ट छाप पाडली असून, येत्या काळात त्यांच्या नेतृत्वाकडे आशेने आणि विश्वासाने पाहिले जात आहे.सचिन देसले यांची झंझावाती कारकीर्द ही केवळ राजकारणापुरती मर्यादित न राहता, लोकसेवेचा नवा आदर्श म्हणून पुढे येत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतून एक प्रेरणादायी नेतृत्व विकसित होत असून, आगामी काळात त्यांचा प्रभाव आणखी बळकट होईल, असे संकेत राजकीय वर्तुळातून मिळत आहेत.

# दौंड येथे पत्रकार संघाच्या वतीने पदग्रहण व सन्मान सोहळ्याचे आयोजन

**पाटस । योगेश राऊत**

दौंड येथील पंचायत समितीच्या कार्यालयात येत्या रविवारी, २० जुलै रोजी भारतीय पत्रकार संघाच्या दौंड विभागातर्फे भव्य पदग्रहण व सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाबाबतची माहिती पत्रकार संघाचे जिल्हा प्रवक्ते प्रा. दिनेश पवार यांनी दिली आहे.या कार्यक्रमाला दौंडचे तहसीलदार अरुण शेलार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस, पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, गटविकास अधिकारी अरुण मरभळ, गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, माजी नगराध्यक्ष प्रेमसुख कटारिया, भाजपाचे ज्येष्ठ नेते स्वप्निल शेठ शहा, ॲडव्होकेट बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत गिरमकर, अमोल काळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच पत्रकार संघाच्या राज्य व विभागीय पातळीवरील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचीही उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमासाठी भारतीय पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एम. एस. शेख, कार्याध्यक्ष सिकंदर नदाफ, प्रदेश संघटक अनिल सोनवणे, पश्चिम महाराष्ट्र




विभागीय अध्यक्ष रमेशजी गणगे पाटील, पुणे जिल्हाध्यक्ष तैनूर शेख, जिल्हा सचिव काशिनाथ पिंगळे, सातारा जिल्हाध्यक्ष संदीपकुमार जाधव, लीगल विंगचे प्रदेशाध्यक्ष कैलास पठारे आणि मामून युनिव्हर्सिटी (उझबेकिस्तान) चे डेप्युटी डीन डॉ. वसीम तांबोळी हेही विशेष उपस्थित राहणार आहेत.सदर कार्यक्रमाचे आयोजन भारतीय पत्रकार संघ दौंडचे अध्यक्ष सुभाष कदम, उपाध्यक्ष पांडुरंग गडेकर, सचिव योगिता रसाळ, तालुका कार्याध्यक्ष जयदीप बगाडे, जिल्हा संघटक रवींद्र देसाई तसेच कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असल्याचेही प्रा. पवार यांनी स्पष्ट केले.

# रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून खास योजना

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधव व महिलांसाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून विशेष कृषी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, पंचायत समिती कृषी विभागामार्फत या योजनांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. शेती क्षेत्रात आधुनिकता आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी या योजना उपयुक्त ठरणार आहेत.या योजनांअंतर्गत शेतकऱ्यांना ताडपत्री, सौरदीप संच, मल्चिंग पेपर, सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहन, सुधारित शेती अवजारे, एचडीपीई किंवा पीव्हीसी पाईप, तसेच बायोगॅस संयंत्र यांचा पुरवठा ७५ टक्के अनुदानाच्या आधारावर केला जाणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी सत्यनारायण मंदिर, रोहा येथे उपस्थित राहून आपल्या नावाची नोंदणी करावी.



नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा, ८ अ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक आणि पासपोर्ट साईझ फोटो आदी आवश्यक कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. ही योजना अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी आणि त्यांचा प्रत्यक्ष फायदा व्हावा, या उद्देशाने दीपक फाउंडेशनतर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत असून, अधिक माहितीसाठी सोनाली जंगम यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी आवश्यक असलेल्या साधनसामग्रीसाठी मोठ्या प्रमाणावर मदत मिळणार असल्याने या योजनांचा लाभ घेण्यासाठी रोहा तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणाऱ्या सत्यजित ताईतवाले यांचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते सन्मान

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे घडलेल्या खून प्रकरणाचा अत्यंत शिस्तबद्ध व प्रभावी तपास करत गुन्हेगारास तातडीने अटक करून योग्य ती कायदेशीर कारवाई करणाऱ्या पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

पोलीस निरीक्षक ताईतवाले यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध गंभीर गुन्ह्यांची उकल करत कायदा आणि सुव्यवस्थेच्या राखणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कर्तव्यदक्षता, वेळेचे भान आणि निर्भीड निर्णयक्षमता यामुळे त्यांचे काम पोलिस दलात सतत चर्चेचा विषय ठरले आहे. याच कार्यतत्परतेची दखल घेत त्यांना शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

गौरव सोहळा पोलीस अधीक्षक कार्यालयात पार पडला. यावेळी पोलीस विभागातील वरिष्ठ



अधिकारी, स्थानिक मान्यवर, तसेच सहकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने ताईतवाले यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

गौरवप्रसंगी प्रतिक्रिया देताना पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले म्हणाले, हा सन्मान माझ्या कामगिरीची पोचपावती आहे. माझ्यावर अधिक जबाबदारी येऊन पडली असून, नागरिकांचा विश्वास टिकवण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन.

ताईतवाले यांच्या या सन्मानामुळे पोलिस विभागातील इतर कर्मचाऱ्यांमध्येही प्रेरणा निर्माण झाली आहे. समाजातील कायदा–सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान हा केवळ पुरस्कार नसून, कर्तव्यनिष्ठेची सार्वजनिक कबुली आहे.

# खेमजई येथे पशुवैद्यकीय शिबिरास शेतकऱ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद




**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील खेमजई येथे दिनांक १४ जुलै रोजी सकाळी ८ वाजता पशुवैद्यकीय लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथील सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी केले होते.या शिबिरात डॉ. सतीश आगढे सरांच्या मार्गदर्शनाखाली गायी, बैल, बकऱ्या यांसारख्या विविध पाळीव जनावरांचे लसीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लसीकरण प्रक्रियेत सहभागी होऊन प्राणी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण काम बजावले. शिबिराच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती घडवून आणण्यात आली, तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या सेवाभावी कार्याचे मनापासून कौतुक केले.या शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रदिप मोटघरे, प्रेम मारचेट्टिवार, पवन आमने, कुंदन झामरे, भूषण गावंडे, लोकेश चव्हाण, यश ढबाले आणि अंकुश यन्नावार यांचा समावेश होता.तसेच खैरगाव येथील कृषीकन्या नोमिका बारसागडे, दिशा भगत, श्रुती राऊत, प्रणाली बेद्रे, प्राजक्ता रामटेके, श्रद्धा आत्राम आणि संस्कृती बारब्दे यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला.कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, रावे समन्वयक राहुल तायडे, तसेच रावे प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे परिसरात पशुसंवर्धन आणि आरोग्यविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# पंजाब नॅशनल बँक, पुणे मंडळाच्या 'रिटेल ऋण संपर्क मेळाव्या'ला पुणेकरांचा भरघोस प्रतिसाद!
## ग्राहक समाधानी; गृह, वाहन, शैक्षणिक कर्जासह तत्काळ मंजुरीची सुविधा

**शिरूर । रमेश बनसोडे**

पंजाब नॅशनल बँक, पुणे मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मासिक 'रिटेल ऋण संपर्क मेळाव्या'ला पुणेकर नागरिक, महिला उद्योजिका, बांधकाम व्यावसायिक आणि विविध क्षेत्रातील ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुण्यातील पिंपळे सौदागर, बावधन, एफ.सी. रोड आणि वाघोली या प्रमुख ठिकाणी एकाच वेळी पार पडलेल्या या उपक्रमात गृहकर्ज, वाहनकर्ज, शैक्षणिक कर्ज, तारण कर्ज तसेच प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसारख्या योजनांची माहिती आणि तत्काळ कर्ज मंजुरी सेवा देण्यात आली.या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे ग्राहकांना 'तुरंत कर्ज मंजुरी' देण्यावर विशेष भर देण्यात आला. पारदर्शक व्यवहार, सुलभ सेवा, ग्राहक संवाद आणि गरजेनुसार मार्गदर्शन या चार मुख्य आधारांवर बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्राहकांशी थेट संवाद साधत शंकांचे निरसन केले.



बँकेचे मंडळ प्रमुख देवेंद्र सिंग यांनी सांगितले की, ग्राहकांच्या गरजांचे नेमके आकलन करून त्यांना वेळेवर आणि योग्य आर्थिक सहाय्य देणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.

या उपक्रमात प्रभात रंजन प्रधान (महाव्यवस्थापक, आंतरराष्ट्रीय बँकिंग विभाग, प्रधान कार्यालय – नवी दिल्ली) यांनीही उपस्थित राहून ग्राहकांशी थेट संवाद साधला. त्यांनी बँकेच्या पारदर्शक व्यवहार, विश्वासार्हता आणि सेवा–वचनबद्धतेवर भर देत बँकेचा सामाजिक सहभाग अधोरेखित केला.रोहित जैन, राजीव कुमार राय, व्ही. श्रीनिवास रेड्डी, मनीषा शर्मा, यशबीर पांडे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही ग्राहकांशी संवाद साधून, बँकेच्या सेवा अधिकाधिक उपयुक्त कशा ठरतील याबाबत मार्गदर्शन केले.या मेळाव्यात पुण्यातील नामांकित शिक्षण संस्था, बांधकाम व्यावसायिक, महिला उद्योजक आणि युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पारदर्शक सल्ला, सुलभ प्रक्रिया आणि तत्काळ सेवा यामुळे उपस्थित ग्राहकांनी बँकेच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले.पुढील टप्प्यात पुणे मंडळातील इतर शाखांमध्येही अशा प्रकारचे मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याचे संकेत बँकेच्या वतीने देण्यात आले आहेत.ज्यांना गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा शैक्षणिक कर्जाची गरज आहे, त्यांनी बँकेच्या अशा मेळाव्यांचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी बँकेच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या किंवा जवळच्या शाखेत संपर्क साधा.

## शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरू–शंकरराव म्हसकर यांचा इशारा

# इको सेन्सिटिव्ह झोन विरोधात रोह्यात शेकापचा आक्रमक पवित्रा! तहसीलदार,प्रांताधिकारी व वन विभागाला निवेदन

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यांमध्ये केंद्र सरकारकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या इको सेन्सिटिव्ह झोनच्या मसुद्याचा तीव्र विरोध करत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने रोहा येथे जोरदार आंदोलनात्मक पवित्रा घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर तहसीलदार, प्रांताधिकारी आणि उपविभागीय वन अधिकारी यांना निवेदन सादर करत या प्रस्तावाची तातडीने पुनर्रचना करून, शेतकऱ्यांवर लादला जाणारा अन्याय थांबवावा, अशी मागणी करण्यात आली.
या केंद्रिय मसुद्यानुसार, रायगड जिल्ह्यातील ४३७ गावे, तर केवळ रोहा तालुक्यातील ११९ गावे इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे हक्क, जमिनीचा उपयोग आणि विकासाच्या संधींवर निर्बंध घालणारा हा निर्णय शेतकरीविरोधी व अन्यायकारक असल्याचा आरोप शेकाप नेत्यांनी केला.या पार्श्वभूमीवर शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, आरसीसी बँकेचे संचालक गणेश मढवी, मजूर फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, मारुती खांडेकर, गोपीनाथ गंभे, खेळू ढमाल, पुरोगामी युवक संघटनेचे अध्यक्ष संतोष दिवकर, तसेच तालुक्यातील शेकापचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी बोलताना शंकरराव म्हसकर म्हणाले, केंद्र शासनाने जाहीर केलेला इको सेन्सिटिव्ह झोनचा प्रस्ताव हा बळीराजाच्या भवितव्याशी खेळ करणारा आहे. शेतकऱ्यांच्या जमिनींवर, उपजीविकेवर आणि जगण्याच्या अधिकारावर सरळ हस्तक्षेप करणारा हा निर्णय आहे. जर वेळ आली, तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही कोणतीही किंमत मोजायला तयार आहोत.या निवेदनात शेतकऱ्यांच्या जमिनीवर नियंत्रण आणणाऱ्या आणि त्यांना कोणत्याही सल्लामसलतीशिवाय झोनमध्ये सामाविष्ट करणाऱ्या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे. पर्यावरण रक्षणाच्या नावाखाली जर शेतकऱ्यांचीच गळचेपी होत असेल, तर असा विकास आम्हाला नको, असा रोखठोक संदेश या आंदोलनातून देण्यात आला आहे.या मुद्द्यावर प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात मोठ्या जनआंदोलनाची सुरुवात रोह्यातून होईल, अशी स्पष्ट चेतावणी शेकापने दिली आहे.



# कृषीकन्यांनी शेतीला पूरक व्यवसायाचे महत्त्व उलगडले–दुग्धोत्पादन ठरू शकते समृद्धीचे साधन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील मेसा येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाशी संलग्न आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील कृषीकन्यांनी 'शेतीला पूरक व्यवसाय' या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमाला शेतकरी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाचा केंद्रबिंदू दुग्धोत्पादन हा शेतीपूरक आणि उत्पन्नवर्धक व्यवसाय ठरू शकतो, हा मुद्दा होता. कृषीकन्यांनी दुग्धोत्पादनातील संधी, प्रक्रिया, आणि त्याचे फायदे समजावून सांगितले. दुग्धोत्पादन केवळ व्यवसाय नसून ग्रामीण भागातील महिलांसाठी व शेतकऱ्यांसाठी एक स्थिर रोजगाराचा पर्याय ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले.
विशेष मार्गदर्शक म्हणून आनंद निकेतन कृषी महाविद्यालयातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ.




मुकुंद पाटोंड यांनी मार्गदर्शन करताना कमी खर्चात चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि दुग्धोत्पादनात वाढ कशी साधता येईल, यावर मोलाचे विचार मांडले. त्यांच्यासोबत डॉ. गजरलावार, डॉ. पाटील, डॉ. अकोटकर आणि गजभे हे तज्ज्ञही उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन प्रफुल वर्भे यांच्या श्रवण डेअरी, मेसा येथे करण्यात आले होते. आयोजनात प्रियांका सोनवणे, प्रांजली सोनवणे, जान्हवी शर्मा, अंजली तितिरमारे, दिशा सोनटक्के आणि आचल पंचभाई या कृषीकन्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन, समन्वयक डॉ. राहुल तायडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. अश्विनी मानकर आणि विषयतज्ज्ञ डॉ. मुकुंद पाटोंड यांचे मार्गदर्शन लाभले.या उपक्रमातून ग्रामस्थांमध्ये दुग्धोत्पादनाच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली असून, अशा ज्ञानवर्धक उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# प्रकाश चोरमले यांचा सोलापूर जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्तीबद्दल सत्कार



**सोलापूर । प्रतिनिधी**


राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सोलापूर जिल्हा सरचिटणीसपदी नुकतीच नियुक्ती झालेल्या प्रकाश उर्फ पप्पू आप्पा चोरमले यांचा करमाळा तालुक्याच्या वतीने भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन भाजप युवा मोर्चा करमाळा तालुकाध्यक्ष शुभम बंडगर यांच्या हस्ते करण्यात आले होते.कार्यक्रमास भाजप सोलापूर जिल्हा चिटणीस विनोद महानवर, भाजप किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अण्णासाहेब सुपनवर, रासप जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, तसेच सतीश नरुटे, माऊली सलगर, अंकुश लांडगे, राहुल चोरमले, पै. आबा कोंडलकर, शिवाजी राऊत आदी पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रकाश चोरमले म्हणाले, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विचार घराघरात पोहोचवण्याचा माझा प्रयत्न राहील. राष्ट्रवादी काँग्रेसची प्रत्येक गावात संघटना उभारून, जिल्हाभर दौरे करून युवकांची भक्कम फळी तयार करीन. सर्वांना सोबत घेऊन पक्ष मजबूत करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.कार्यक्रमाच्या शेवटी सतीश नरुटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# भूस्खलनाचा धोका; खाण मालकाला मुंबई उच्च न्यायालयाचा दणका

## ठोठावला तब्बल १९० कोटींचा दंड

**बदलापूर । प्रतिनिधी**

बदलापूरजवळील चिंचवली आणि कोपऱ्याची वाडी या दोन गावांजवळ सुरू असलेल्या दगड खाणीवर मुंबई उच्च न्यायालयाने मोठी कारवाई करत तब्बल १९० कोटी ३० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही खाण इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये कार्यरत असून नियमभंग आणि परवानगीपेक्षा जास्त उत्खनन यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.दगड खाणीमुळे भूस्खलनाचा धोका निर्माण झाला होता. दरड कोसळून गावं उध्वस्त होण्याची शक्यता व्यक्त होत होती. त्याचबरोबर खाणीमुळे वायू आणि ध्वनी प्रदूषण, शेतीयोग्य जमिनी नापीक होणे, पिण्याच्या पाण्याचे झरे आटणे यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या होत्या. चिंचवली आणि कोपऱ्याची वाडी या आदिवासी वस्तीवर या संकटाचा मोठा परिणाम झाला होता.
ग्रामपंचायतीने खाण बंद करण्याचा ठराव घेऊनही खाण सुरूच होती. अखेर स्थानिक ग्रामस्थ आणि 'वनशक्ती' या सामाजिक संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. या एकत्रित



लढ्याला यश मिळत राज्यात प्रथमच दगड खाणीवर इतक्या मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
परवानगी क्षेत्राच्या बाहेर सुमारे १ लाख ३० हजार ब्रास उत्खनन करण्यात आले असून त्यासाठी आवश्यक असलेली रॉयल्टीही खाण मालकाने भरलेली नव्हती. या प्रकारामुळे न्यायालयाने १९० कोटी ३० लाखांचा दंड ठोठावला असून, संबंधित रक्कम सक्तीनं वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.
या निर्णयामुळे आता संबंधित खाण बंद होणार असून, ग्रामस्थांमध्ये मोठा आनंद आणि समाधान व्यक्त होत आहे. प्रदूषण, आरोग्यधोके, शेतीवरील परिणाम अशा अनेक संकटांतून आता सुटका मिळणार असल्याने गावकऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत केले आहे.
या निर्णयामुळे पर्यावरणपूरक विकासाच्या दृष्टीने न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, इको सेन्सिटिव्ह क्षेत्रांतील अशा अनधिकृत आणि विनाशकारी खाणींविरोधात कठोर भूमिका घेण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

# कुस्तीच्या आखाड्यात यशाची गदा फिरवणाऱ्या आश्लेषा बागडेचा महाविद्यालयात गौरव

## ब्रॉन्झ पदक विजेती खेळाडू सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा; रश्मी बागल–कोलते यांच्याकडून ५१ हजारांचे बक्षीस

**सोलापूर । प्रतिनिधी**

कझाकिस्तान येथे झालेल्या आशियन कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सोलापूरच्या आश्लेषा कल्याण बागडे हिने ब्रॉन्झ पदक पटकावले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या मोठ्या यशाचा गौरव म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात तिचा सत्कार करण्यात आला.
या वेळी प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी दीदी बागल–कोलते, प्रा. मिलिंद फंड, डॉ. अनिल साळुंखे, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, खेळाडू आश्लेषाचे वडील कल्याण बागडे, व स्वतः आश्लेषा मंचावर उपस्थित होते.
आश्लेषाने दाखवून दिले की, जिद्द, मेहनत आणि चिकाटी असेल तर ग्रामीण भागातील मुलींनाही जागतिक स्तरावर झेप घेता येते,असे मत रश्मी दीदी बागल–कोलते यांनी व्यक्त केले. यावेळी दिगंबरराव बागल प्रतिष्ठानच्या वतीने आश्लेषाला ५१,००० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले.



कार्यक्रमात महाविद्यालयाच्या 'यशवंत' या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या वार्षिक अंक स्पर्धेत ललित गद्य विभागात तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या अमित सरवदे या विद्यार्थ्याचाही विशेष सत्कार झाला.
प्रास्ताविक तिचे मार्गदर्शक प्रा. राम काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मुक्ता काटवटे तर आभार प्रदर्शन प्रा. नितीन तळपाडे यांनी केले. कार्यक्रमास यशवंत परिवारातील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्याध्यापकावर खोट्या तक्रारीद्वारे बदनामीचा प्रयत्न : श्री.अवधूत विद्यालय,वांगी–२ येथील प्रकार

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्री. लाल बहादूर शास्त्री विद्यालय, सालसे (ता. करमाळा) येथील शिक्षक भारतीचे तालुकाध्यक्ष आणि जिल्हा प्रवक्ते विजयकुमार बाबूराव गुंड यांनी श्री. अवधूत विद्यालय, वांगी–२ येथील मुख्याध्यापकांविरोधात जाणूनबुजून खोटी तक्रार करून मानसिक आणि सामाजिक बदनामी केली, असा आरोप संबंधित शाळेच्या प्रशासनातर्फे करण्यात आला आहे.ही घटना दिनांक ८ जुलै २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ९.०० या वेळेत घडली. यावेळी शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक अनुपस्थित असताना कोणतीही परवानगी न घेता गुंड यांनी थेट शाळेत प्रवेश केला. त्यांनी 'शाळा बंद आहे', 'विद्यार्थ्यांना पोषण आहार दिला जात नाही', 'शिक्षक अनुपस्थित आहेत' अशा स्वरूपाचे आरोप करत व्हिडिओ शूटिंग केले आणि ते सोशल मीडियावर प्रसारित

> तक्रार वस्तुनिष्ठ असून, सत्य चौकशीनंतरच स्पष्ट होईल. मुख्याध्यापकांनी आरोप करण्याआधी ४ जुलै व उन्हाळा सुट्टीतील सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करावं.
> – विजयकुमार गुंड
> जिल्हा प्रवक्ते, शिक्षक भारती सोलापूर



केले. तसेच, शाळेतील सीसीटीव्ही फुटेजची मागणीही अधिकृत परवानगीशिवाय करण्यात आली.
मुख्याध्यापकांच्या म्हणण्यानुसार, विजयकुमार गुंड यांचा शाळेत येण्याचा उद्देश शाळेविषयी गैरसमज पसरवणे व वैयक्तिक स्तरावर बदनामी करणे हाच होता. त्यामुळे सदर प्रकाराची चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणी मुख्याध्यापकांनी केली आहे. यासंदर्भातील सविस्तर अहवाल संबंधित केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे.दरम्यान, या प्रकारामुळे शिक्षक व मुख्याध्यापकांना अनावश्यक मानसिक त्रास सहन करावा लागत असून, खोट्या व आधारहीन तक्रारींमुळे शैक्षणिक संस्थांची प्रतिमा मलीन होत असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.
या संदर्भात शिक्षक भारतीचे जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की,तक्रार वस्तुनिष्ठ असून, सत्य चौकशीनंतरच स्पष्ट होईल. मुख्याध्यापकांनी आरोप करण्याआधी ४ जुलै व उन्हाळा सुट्टीतील सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करावं.

## शेतात काम करताना शेतकऱ्याचा अचानक मृत्यू

# शिवणफळ येथील अशोक मोरे यांची हृदयविकाराच्या झटक्याने प्राणज्योत मालवली

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील शिवणफळ येथील शेतकरी अशोक सदाशिव मोरे (वय ५५) यांचा शेतात काम करत असताना अचानक मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (१७ जुलै) दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली.
अशोक मोरे सकाळी सुमारास आपल्या नाद्रा शिवारातील वडिलोपार्जित शेतात सोयाबीन पिकाची डवरणी करण्यासाठी गेले होते. सकाळी १० वाजता त्यांनी शेतीची कामे सुरू केली. दुपारी दीडच्या सुमारास आकाशात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान, शेतीची पाहणी करत असताना ते अचानक कोसळले. बोरगाव (शी.) येथून त्यांचा मोठा मुलगा शेतात आल्यानंतर वडील कुठे दिसत नसल्याने त्याने शोधाशोध सुरू केली. काही वेळाने वडील औत सोडलेल्या ठिकाणापासून सुमारे २०० ते ३०० फूट अंतरावर मृतावस्थेत आढळून आले. घटनेची माहिती गावातील पोलीस पाटलांनी शेगाव पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलीस



कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह पोस्टमार्टमसाठी ग्रामीण रुग्णालय, वरोरा येथे पाठवण्यात आला.
या प्रकरणाचा तपास शेगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा. योगेंद्रसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कांबळे, भिमराव पडोळे, पो.ह.वा. मदन येरणे आणि पोकॉ प्रशांत गिरडकर करीत आहेत. या घटनेमुळे मोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले असा परिवार आहे.